दै. सकाळ दि. १४।५।१०

# जनशिक्षणातून रोजगार निर्मितीवर भर : डॉ. सावंत

कुडाळ, ता. १३ : जनशिक्षण संस्थानच्या माध्यमातून सिंधुदुर्गातील बेरोजगारी दूर करण्यासाठी रोजगार निर्मितीसाठी आतापर्यंत बरेच काम झाले. पुढच्या टप्प्यात हे काम आणखी प्रभावीपणे करायचे आहे, असे प्रतिपादन जनशिक्षण संस्थानचे अध्यक्ष डॉ. एस. टी. सावंत यांनी येथे केले.

मनुष्यबळ विकास मंत्रालय, भारत सरकार पुरस्कृत जनशिक्षण संस्थान सिंधुदुर्गच्या प्रशिक्षकांची बैठक येथील संत राऊळ महाराज महाविद्यालयात आयोजित केली होती. या वेळी ते बोलत होते. या वेळी व्यासपीठावर संस्थेच्या व्यवस्थापकीय कमिटीचे विश्वस्त नकुल पार्सेकर, शिवप्रसाद देसाई, विजय केनवडेकर, संचालक डी. आर. परब उपस्थित होते. सावंत म्हणाले, "प्रत्येक संस्थेची स्वतःची अशी ध्येयधोरणे असतात. त्यानुसार कोणत्या गोष्टीवर अधिक भर दिला पाहिजे, हे प्रत्येक संस्थेने ठरवायचे असते. आपल्या संस्थेने येथील लोकांच्या रिकाम्या हातांना काम मिळून ते स्वावलंबी कसे बनतील, याचा प्रामुख्याने विचार केला."

देसाई म्हणाले, "प्रशिक्षणातून रोजगार निर्मिती ही महत्त्वाची गोष्ट आहे. त्या दृष्टीने प्रशिक्षक हा त्यामधील महत्त्वाचा आत्मा आहे. प्रशिक्षणामध्ये वेळोवेळी कोणते बदल अपेक्षित आहेत हे निदर्शनास आणले पाहिजेत. रोजगार निर्मितीमध्ये प्रशिक्षकाची भूमिका फार मोलाची आहे." पार्सेकर यांनी जनशिक्षणने आतापर्यंत केलेल्या कामाचा आढावा घेतला. केनवडेकर म्हणाले, "प्रशिक्षण हे केवळ प्रशिक्षण न राहता ते रोजगार निर्मितीचे साधन बनले पाहिजे." प्रास्ताविक संचालक परब यांनी केले. यावेळी जिल्ह्यातील प्रशिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.